**अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,**
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/११४६
दिनांक :२५/०५/२०२०

**-: आदेश :-**

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
कोरोना विषाणू आजाराच्या (कोवीड-१९) अनुषंगाने अभियंता उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) आदेश जा .क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/११४५ , दि. २५.०५,२०२०
५) आदेश जा .क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/७७९, दि. ११.०५.२०२०

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

त्यास अनुसरून पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रिय कार्यालयातील प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) सहाय्यक आयुक्त यांना सहकार्य करण्यासाठी उप अभियंता / शाखा अभियंता यांची संदर्भ क्र ४ चे आदेशान्वये समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या आदेशानुसार संदर्भ क्र ४ चे आदेशामधील अधिकारी/ कर्मचारी यांची प्रतिबंधित क्षेत्रामध्ये नियुक्ती करण्यात आली असल्याने त्याऐवजी खालीलप्रमाणे नियंत्रक उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

| क्र. | अधिकारी/ कर्मचाऱ्याचे नाव व हुद्दा व मोबाईल क्र. | कामाचे ठिकाण | नियंत्रण अधिकारी यांचे नाव व मो. क्र व परिमंडळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.साबळे नितीन भालचंद्र,<br>उप अभियंता, मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग (मो.क्र. ९६८९९१३५५)<br>पुणे महानगरपालिका | ट्रीनिटी महाविद्यालय वसतिगृह, कोंढवा सासवड रोड पुणे- नियंत्रक | श्री. नंदकुमार शामराव खळदकर, उप अभियंता (स्थापत्य) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग (मो.क्र. ९६८९९३१७३६)<br>- परिमंडळ क्र. ४ चे अंतर्गत |
| २ | श्री.तायडे सुशिल गणेशराव<br>शाखा अभियंता, पाणी पुरवठा विभाग<br>(मो. क्र. ९४०३२३१३२३)<br>पुणे महानगरपालिका | शासकीय तंत्र निकेतन, पुणे - नियंत्रक | श्री. गायकवाड धनंजय सदाशिव, उप अभियंता, पथ विभाग<br>(मो.क्र.९९२३४८३३६३)<br>- परिमंडळ क्र. २ चे अंतर्गत |

तसेच ज्या सेवकांची संदर्भ क्र. ४ अन्वये आदेश रद्द करण्यात आले असून त्यांचे ऐवजी संदर्भ क्र. ५ नुसार परिमंडळ निहाय सेवा अधिग्रहित केलेल्या कर्मचाऱ्याची नियुक्ती उप आयुक्त, परिमंडळ यांनी करावयाची आहे. तसेच केलेल्या आदेशाची प्रत आमचे कार्यालयाकडे सादर करावी.

सदर अधिकारी / कर्मचारी यांनी सोबतच्या यादीत दर्शविल्याप्रमाणे संबंधित उप आयुक्त, परिमंडळ यांचे नियंत्रणाखाली व संबंधित सहाय्यक आयुक्त यांचे समन्वयाने स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून सदर कामकाज करावयाचे आहे.

या आदेशातील अधिकारी/ कर्मचारी यांचे यापूर्वी कोरोना विषयक कामकाजासाठी काढण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येत आहे.

सोबतच्या यादीतील अधिकारी / कर्मचारी नेमून दिलेल्या ठिकाणी हजर न झाल्यास व सदरच्या कामास नकार देणा-या, हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वरील सेवकांची नियुक्ती या कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदरचे सेवकांचे रुजू अहवाल उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचेकडे सादर करावेत.

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

**प्रत –** १)मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.